महाराष्ट्र टाइम्स
नाशिक PLUS
ADVERTORIAL, ENTERTAINMENT PROMOTIONAL FEATURE
नाशिक ★ सोमवार, २६ सप्टेंबर २०१६

CULTURE CLUB
आजच रु. २११/- चा चेक (BCCL च्या नावाने) देऊन, घ्या कल्चर क्लब कार्ड व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या तिकिटांवर मिळवा आकर्षक सूट आणि बरंच काही

सतीश काळे




महाराष्ट्र टाइम्स'तर्फे रविवारी आयोजित केलेल्या 'मटा' हेरिटेज वॉकच्या माध्यमातून नाशिककरांनी टाकळीतील समर्थ रामदासांचा मठ तसेच मठाधिपतींच्या समाधी पाहिल्या. यावेळी नाशिककरांनी दुर्लक्षित समाधींचे विखुरलेले चिरे उत्स्फूर्तपणे गोळा करीत समाधींच्या संवर्धनाची मागणी केली.

# 'मटा'च्या हेरिटेज वॉकने दिला वारसा जतनाचा संदेश

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

टाकळीतील समर्थांच्या मठाच्या मठाधिपतींच्या समाधींचे चिरे उद्ध्वस्थ अवस्थेत पाहून 'मटा' हेरिटेज वॉकमध्ये सहभागी झालेल्या नाशिककर गहिवरलेले. विखुरलेले दगडी चिरे सर्वांनी उत्स्फूर्तपणे एकत्रित करीत ते पुन्हा समाधी स्थळी ठेवले. नाशिकच्या या समाधीरूपी वारशांचे संवर्धन व जीर्णोध्दार व्हायला हवा, अशी मागणी यावेळी व्यक्त करण्यात आली. 'मटा' हेरिटेज वॉक ही चळवळ रुपाने नाशिकच्या वारशांच्या संवर्धनासाठी जनजागृती करू लागल्याचा प्रत्यय यावेळी नाशिककरांनी अनुभवला.

'महाराष्ट्र टाइम्स'तर्फे दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी 'मटा' हेरिटेज वॉकचे आयोजन केले जाते. या माध्यमातून नाशिकच्या वारसा नाशिककरांना नुसते दाखविण्याचाच नाही तर हा वारसा जपला पाहिजे, याची जाणीव जागृतीही या उपक्रमातून निर्माण होत असल्याचा प्रत्यय रविवार समर्थांच्या टाकळीतील हेरिटेज वॉक दरम्यान आला. टाकळीतील समर्थ रामदासांनी स्थापन केलेल्या पहिल्या मठाचे आतापर्यंत नऊ मठाधिपती लाभले आहेत. यापैकी सात मठाधिपतींच्या समाधी गोदावरी काठी टाकळी मठापासून अर्धाकिलोमीटरवर आहेत. या सर्व समाधी दुर्लक्षित अवस्थेत असल्याने त्यांची मोडतोड झालेली आहे. या समाधींचे संवर्धन व्हावे, यासाठी मठातर्फे प्रयत्न केले जात आहेत. मात्र, महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष अन् उदासीनतेमुळे या समाधी समर्थभक्तांपासून अजूनही लांबच आहेत. या समाधींपर्यंत जाणेही कठीण असल्याने हेरिटेज वॉकदरम्यान त्या समाधींपर्यंत जाऊन त्या अनुभवण्याची संधी नाशिककरांना मिळाली. यावेळी समाधींच्या अवस्थेमुळे सहभागी झालेले नाशिककर गहिवरले. आपला हा वारसा इतका दुर्लक्षित कसा राहू शकतो, असा प्रश्नही यावेळी उपस्थित झाला. यावेळी नाशिककरांनी समाधींची विखुरलेले दगडी चिरे मेहनतीने जमा केले अन् समाधीस्थळी पुन्हा ठेवले. या समाधींचे संवर्धन तातडीने व्हावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

>> नाशिककरांनी अनुभवली समर्थांची टाकळी...२